पीएच. डि. संशोधन आराखडा

“नांदेड जिल्ह्यातील शैक्षणिक सुविधा आणि लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा सहसंबंध : एक भौगोलिक अभ्यास”

:अभ्यासक:

माजंरीकर अश्विनी चंद्रपाल

(एम. ए., बी. एड., एम. फिल. भुगोल)

:संशोधन मार्गदर्शक:

डॉ. कानवटे यु. एस.

(एम. ए. भुगोल, बी एड., पी एच डी.)

वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी , नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विध्यापीठ,

नांदेड.

“नांदेड जिल्हयातील शैक्षणिक सुविधा आणि लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा सहसंबंध : एक भौगोलिक अभ्यास”

आजच्या विज्ञानयुगात शिक्षण ही काळाची गरज आहे. शिक्षण हा समाजाच्या विकासाचा पाया मानला जातो. समाजाची मुळ समाजिक व सांस्कृतिक जडण-घडण ही प्राथमिक स्तरावरिल शिक्षणाच्या वाढीवर परिणाम करत आसते. खर तर समाज हा कोणत्या ना कोणत्या पध्दतीचे शिक्षण घेतच असलेला असतो व घेत असल्याचे अखंडीत चक्र चालु असते.

ज्यप्रमाणे कोणत्याही देशाचा, राज्याचा, जिल्हयाचा वा तालुक्याचा विचार करता, विकास घडण्यासाठी त्यामागची बाजु म्हणजे त्या ठिकाणाची लोकसंख्या ही त्या ठिकाणच्या विकासासाठी महत्वपुर्ण ठरते. त्यामुळेच लोकसंख्या हा महत्वाचा घटक आहे. लोकांच्या गरजा सोईसुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे असते. ज्या ठिकाणी सोयी सुविधा उपलब्ध असतात त्या ठिकाणी लोकसंख्येची घनता व संख्यात्मक प्रमाण अधिक असते. लोकांचे जीवन शिक्षण, व्यवसाय, औधोगिक हालचाली व इतर तत्सम बाबींशी संबंधीत असते. ते यशस्वी ठरवण्यासाठी उपलब्ध सुविधा त्यांच्यापर्यंत पोहोचणे गरजेचे असते. शाळेमधील देखिल अनेक प्रकारच्या सुविधा असतात. त्या उपलब्ध आहेत किंवा नाहीत ते तपासणे गरजेचे असते.

शिक्षण हा शिक्षण प्रक्रियेचा मानबिंदु असतो तर विद्यार्थी हा शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे.

“चारित्र्याशिवाय ज्ञान व्यर्थ असते आणि विवेकाशिवाय विज्ञान व्यर्थ असते.” अशा विचारांना राहिलेले सुगंधित पुष्प म्हणजे आपला विध्यार्थी. शिक्षाणाचा मुलमंत्र मुल्यशिक्षण हा आहे.

शिक्षणमुळे मानवाच्या सर्वांगीण विकास होतो. हे सर्वांना समजावे व तसे समजल्यावरच शिक्षणाचा प्रसार होतो. प्राथमिक शिक्षण हे महत्वाचे आहे ते सर्वांसाठी मोफत व सक्तीचे असावे. तसेच प्रत्येक व्यक्तीला पायाभुत शिक्षण मोफत मिळाले पाहिजे. तसेच भौगोलिक विकास घडुन येण्यासाठी भौगोलिक क्षेत्राची निवड करणे महत्वाचे आहे.

भौगोलिक क्षेत्राची निवड योग्य प्रकारे केल्यास फायदेशिर ठरते. प्रस्तुत शोध निंबधात नांदेड जिल्हयातील शैक्षणिक सुविधा आणि लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा सहसंबधात्मक अभ्यास, अशा विषयातुन त्या बदलची शोध प्रबंधाद्वारे प्रत्यक्षातील माहिती मिळवुन कशा प्रकारचे सुविधा आहे हे माहीतीद्वारे समजते. नांदेड जिल्हयातील एकुन भौगोलिक क्षेत्रफळ १०३४१०० हेक्टर एवढे आहे.

भारतातील अठ्ठाविस घटक राज्यापैकी महाराष्ट्र एक राज्य आहे. महाराष्ट्र राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले. त्यापुर्वी १ नोंव्हेबर १९५६ रोजी व्देभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात होते. या व्देभाषिक मुंबई राज्यात कच्छ व सौराष्ट्र या गुजराती भाषिक प्रदेशाबरोबरच हैद्राबाद संस्थानातील मराठी भाषिकांचा मराठवाडा हा अंतर्भुत केला गेला. या हैद्राबाद संस्थानाअंतर्गत नांदेड जिल्हा समाविष्ठ होता.१ मे १९६० रोजी मुंबईसह मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर नांदेडला महाराष्ट्रातील जिल्हयाचे स्थान प्राप्त झाले.

महाराष्ट्र राज्य गुजरातव मध्यप्रदेश या राज्यांच्या दक्षिणेस आहे. महाराष्ट्राचा अक्षयवृतीय विस्तार १५८ अंश उतर ते २११ अंश उतर आणि रेखावृतीय ७२६ अंश पुर्व ते ८०९ अंश पुर्व इतका आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :-

१) नांदेड जिल्हयातील प्राकृतिक रचना अभ्यासणे.
२) नांदेड जिल्हयातील सामाजिक व अर्थिक रचना अभ्यास.
३) नांदेड जिल्हयातील लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा अभ्यास करणे.
४) नांदेड जिल्हयातील शाळेमधिल शैक्षणिक सुविधांचा अभ्यास करणे.
५) नांदेड जिल्हयातील शैक्षणिक सुविधा व लोकसंख्याशास्त्रीय घटक यांचा सहसंबध तपासणे.

गृहितके :

1) नांदेड जिल्हयात शैक्षणिक सुविधा विकसित होण्यासाठी लोकसंख्याशास्त्रीय घटक महत्वाचे आहे.
2) लोकसंख्याशास्त्रीय घटक अनुकुल असल्यामुळे नांदेड जिल्हयातील शैक्षणिक सुविधा विकसित झाल्या आहेत.
3) नांदेड जिल्हयात लोकसंख्याशास्त्रीय घटकाच्या आधारावर शैक्षणिक सुविधा विकसित होण्यासाठी चालना मिळाली आहे.

संशोधनाची साधने :-

1. प्रत्यक्ष मुलाखत
2. गणितीय व सांख्यिकीय पध्दती
3. निरिक्षण
4. दुय्यम आकडेवारी
5. दुय्यम माहीती
6. पडताळा सुची
7. संगणकीय सुविधा
8. प्रश्नावली

अशा प्रकारे माहितीचे विश्लेषण करण्यात यईल. संबंधित संशोधनाच्या विषयावर अवलंबुन माहिति घेण्याचा माझा अल्पसा प्रयत्न आहे.

प्रकरण विभागणी

१) संकल्पनात्मक आराखडा

२) नांदेड जिल्ह्याची भौगोलीक पार्श्वभुमी

३) शैक्षणिक सुविधा

४) शैक्षणिक कल

५) लोकसंख्याशास्त्रीय घटक

६) शैक्षणिक सुविधा व लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा संबध

७) निष्कर्ष व शिफारशी

८) संदर्भ सुची

अभ्यासक	संशोधन मार्गदर्शक
मांजरीकर अश्विनी चंद्रपाल	**डॉ. कानवटे यु. एस.**